# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारत मौसम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**फोन नं.: (०२३५८) २८२३८७** **ई-मेल: dpl.amfu@gmail.com**

**अंक ११/२०२१** **दिनांक ०५/०२/२०२१** **कालावधी ५ दिवस**

**डॉ. प्रशांत बोडके**,
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे**,
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव**,
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ३०/०१/२०२१ ते ०५/०२/२०२१) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०६/०२/२०२१ सकाळी ८:३० पासून १०/०२/२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (स्त्रोत: हवामान वेधशाळा, ठाणे) | | | | | | | | (स्त्रोत: प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई) | | | | |
| ३०/०१ | ३१/०१ | ०१/०२ | ०२/०२ | ०३/०२ | ०४/०२ | ०५/०२ | | ०६/०२ | ०७/०२ | ०८/०२ | ०९/०२ | १०/०२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३१.८ | ३३.२ | ३३.० | ३४.० | ३४.० | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३१ | ३० | ३१ | ३२ | ३३ |
| १८.८ | १९.० | १९.८ | २०.० | २०.२ | २०.६ | - | **किमान तापमान (अं.से)** | १८ | १७ | १८ | १८ | १९ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र |
| ५९ | ७२ | ६५ | ६५ | ५५ | ७३ | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ५४ | ५४ | ५३ | ६० | ६० |
| ५८ | ४५ | ६५ | ५० | ४८ | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ३८ | ३५ | ३४ | ४० | ४१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | - | **वाऱ्याचा वेग(किमी/तास)** | ९ | ११ | ९ | ६ | ६ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | - | **वाऱ्याची दिशा** | ई. | ई.पू. | पू. | ई.पू. | ई.पू. |

## हवामान सारांश /ईशारा

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार ठाणे जिल्ह्यात पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहून दिनांक ७ फेब्रुवारी पर्यंत किमान तापमानात काही अंशी घट होण्याची शक्यता असून दिनांक ८ ते १० फेब्रुवारी २०२१ दरम्यान कमाल आणि किमान तापमानात क्रमश: वाढ संभवते तसेच आकाश निरभ्र राहील. |

## हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **आंबा** | मोहोर अवस्था | • **मोहोर फुटलेल्या** आंबा बागेमध्ये मोहोरावर **तुडतुडे, मिजमाशी इ.किडींचा तसेच भुरी रोगाचा** प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने **मोहोर फुलण्यापूर्वी** तुडतुडे आणि मिजमाशीच्या नियंत्रणासाठी आंबा मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार तिसरी फवारणी इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि.ली. प्रति १० लिटर पाणी आणि भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>• (टीप: मोहोर नुकताच फुलत असताना ते फलधारणा होईपर्यंत किटकनाशकाची फवारणी टाळावी. फवारणी करणे गरजेची असल्यास बागेतील परागीकरण करणाऱ्या कीटकांवर होणारा परिणाम टाळण्यासाठी परागीकरणाचा कालावधी वगळून सकाळी ९.०० ते १२.०० किंवा सायंकाळी ३.०० वाजल्यानंतर फवारणी करावी.)<br>• या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात.<br>• शिफारशीत दिलेली कीटकनाशकाची/बुरशीनाशकाची मात्रा ही मनुष्यबळाने वापरण्यात येणाऱ्या पंपासाठी आहे. |
| **काजू** | फळधारणा | • **फळधारणा** झालेल्या काजूच्या फळांवर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने किडींच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. |

| | | |
|---|---|---|
| | | किंवा असिटामिप्रीड २० टक्के एसपी ५ ग्रॅम प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत). या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात.<br>• **<u>टीप:</u>** ढेकण्या किड सकाळी आणि संध्याकाळच्या वेळेस सक्रीय असल्याने किडीच्या प्रभावी नियंत्रणासाठी फवारणी शक्यतो सकाळी १०.०० पूर्वी किंवा सायंकाळी ४.०० वाजल्यानंतर करावी. या अगोदर फवारणी घेतली असल्यास किड व रोगाच्या प्रादुर्भावाकडे झाडाचे निरीक्षण करावे आणि प्रादुर्भाव दिसून आल्यास उपाय योजना कराव्यात.<br>• काजू बियांचे उत्पादन व बियांचे आकारमान वाढविण्यासाठी प्रति झाड ताज्या किंवा आठ दिवसापर्यंत साठविलेल्या २५ टक्के गोमुत्राच्या ५ लिटर द्रावणाची फवारणी आणि २५ टक्के गोमुत्राच्या १० लिटर द्रावणाची झाडाच्या बुंध्यामध्ये जिरवणी पालवी आल्यापासुन एका महिन्याच्या अंतराने अशा एकूण चार फवारणी कराव्यात. |
| **नारळ** | फळधारणा | • नारळाच्या पाच वर्षावरील प्रती माडास ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश खताची तिसरी मात्रा बांगडी पध्दतीने देण्यात यावी. वर दिलेली खताची मात्रा पाच वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी १/५ पट, दुसऱ्या वर्षी २/५ पट, तिसऱ्या वर्षी ३/५ पट आणि चौथ्या वर्षी ४/५ पट द्यावीत.<br>• याव्यतिरिक्त १० किलो निबोळी पेंड आणि झिंक, बोरोन, मॉलीबेन्डम व कॉपर ही अतिसूक्ष्म अन्नद्रव्ये २०० ग्रॅम प्रति माड वर्षातून एकदा शक्यतो दुसऱ्या किंवा तिसऱ्या खताच्या मात्रेसोबत देण्यात यावी. |
| **वाल, चवळी** | फुलोरा ते शेंगा अवस्था | • वाल पिक फुलोऱ्यात येण्याची व दाणे भरण्याची अवस्था ओलाव्यासाठी अति सवेंदनशील असल्याने वाल पिकास फुलोऱ्या येण्याच्या व दाणे भरण्याच्या अवस्थेत पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>• वाल पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने किडी कोवळ्या शेंड्यावर पानाच्या खालच्या भागातील रस शोषून घेतात त्यामुळे झाडाची वाढ खुंटते तसेच किडीने बाहेर टाकलेल्या मधासारख्या चिकट द्रावणामुळे पानांजवळ काळ्या बुरशीची वाढ दिसून येते. मावाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १२ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता वाटल्यास दुसरी फवारणी १५ दिवसांनंतर करावी. |
| **मिरची** | वाढीची अवस्था ते फळधारणा अवस्था | • मिरची पिकावर फुलकिडे, कोळी व पांढरी माशी ई रसशोषक किडीमुळे चुरडा मुरडा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडी पानातील रस शोषून घेतल्याने मिरचीची पाने सुरकुतून त्यांची वाढ खुंटते. यासाठी गोमुत्र १० टक्के आणि अझाडीराक्टीन १०००० पी.पी.एम. ३ मि.ली. प्रति लिटर पाण्यातून आलटून पालटून सात दिवसांच्या अंतराने फवारणी करावी, तसेच पिकामध्ये निळ्या रंगाचे चिकट कागदाचे सापळे लावावेत. |
| **वांगी** | फुलोरा ते फळधारणा अवस्था | वांगी पिकावर शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी किडग्रस्त शेंडे व फळे जमा करून नष्ट करावीत व फेनव्हलरेट १० मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **भेंडी** | वाढीची अवस्था | • उन्हाळी भेंडी पिकामध्ये रसशोषक किडीच्या व्यवस्थापनासाठी पिवळे चिकट कागदी सापळे लावावेत. |
| **वेलवर्गीय भाजीपाला** | फुलोरा ते फळधारणा अवस्था | • वेलवर्गीय पिकामध्ये नाग अळीच्या प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून अळी पानाच्या आत शिरून आतील भाग खाते त्यामुळे पानावर नागमोडी रेषा दिसून येतात. प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी ४ टक्के निबोळी अर्क किंवा कडूनिंबयुक्त कीटकनाशक अझाडीरेक्टीन (१० हजार पीपीएम) २० मि.ली. किंवा प्रोफेनोफोस ५० टक्के प्रवाही १५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| **मोगरा** | फुलधारणा | • मोगरा पिकावर कळी पोखरणारी अळी, कोळी व कळ्या खाणारी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास किडीच्या नियंत्रणासाठी प्रादुर्भावग्रस्त पाने व कळ्या काढून नष्ट कराव्यात व गरजेनुसार ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.

अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा.